# रस्ते खोदाईसाठी नव्या दरसूचीचा प्रस्ताव

## रस्ते खोदल्यास खर्च मोबाइल कंपन्यांकडून वसूल करणार

**नाशिक :** ओएफसी केबल्स, स्मॉल सेल आणि टेलेग्राफ लाईनसाठी रस्ते खोदल्यास त्याचा संपूर्ण खर्च आता मोबाइल कंपन्यांकडून वसुल केला जाणार आहे. यासंदर्भात महापालिकेच्या बांधकाम विभागाने आता नव्या दरसुचीचा प्रस्ताव महासभेच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. या नवीन प्रस्तावाच्या अनुषंगाने डांबरी रस्त्यांसाठी ७४७५ रुपये, तर कॉंक्रीट रस्त्यांमध्ये ४८५४ रुपये प्रति मीटर दराने मोबाइल कंपन्यांकडून खर्च वसूल केला जाणार आहे. या कंपन्यांनी स्वखर्चातून रस्ते दुरूस्तीची तयारी दर्शविल्यास २० टक्के बँक गॅरंटी घेतली जाणार असल्याचेही प्रस्तवात म्हटले आहे.

भारतीय दूरसंचार निगम यासह विविध मोबाइल कंपन्यांनी ओएफसी केबलसाठी खोदलेल्या रस्त्यांमुळे शहरातील रस्त्यांवर खड्डेच खड्डे निर्माण झाले आहेत. रस्ते खोदाईची परवानगी देताना महापालिका संबंधित कंपनी तसेच संस्थांकडून रस्ते दुरूस्ती शुल्काची आकारणी केली जाते. मात्र या रस्ते दुरूस्ती शुल्कातून अत्यंत कमी निधी मिळत असल्याने त्यातून रस्ते दुरूस्तीचा खर्च भागत नाही. याउलट महापालिकेला खिशातून पैसे टाकून रस्ते दुरूस्ती करण्याची वेळ येते. त्यामुळे दर सुचीचे पुनर्विलोकन करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने तयार केला आहे.

नवीन दूरसंचार कायदा देशभरात लागू करण्यात आला असून, त्यानुसार रस्ते दुरूस्तीबाबत परवानगी मिळण्याची मागणी जिओ डिजिटल फायबर प्रा. लि. व भारती एअरटेल लि. कंपनीकडून महापालिकेकडे करण्यात आली होती. त्यानुसार महापालिका बांधकाम विभागाने रस्ते दुरूस्ती शुल्कात सुधारणा करीत नव्या दरसूचीचा प्रस्ताव महासभेच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. नवीन दर सुचीतील शुल्काव्यतिरीक्त अन्य कोणतेही शुल्क महापालिका संबंधित कंपन्यांकडून आकारणार नाही. मात्र कंपनीने रस्ते पूर्ववत करून देण्याची हमी घेतल्यास निश्चित केलेले दर घेऊन गुणाकारानुसार येणाऱ्या एकूण रक्कमेवर २० टक्के बँक गॅरंटी घेतली जाणार आहे.

### असे आहेत नवे दर

- साईड पट्टीत मुरुम मातीत खोदाई– १८२ रुपये प्रति मिटर
- खडीच्या रस्त्यांमध्ये खोदाई– २१३६ रुपये प्रति मिटर
- डांबरी रस्त्यांमध्ये खोदाई– ७४७५ रुपये प्रति मीटर
- कॉंक्रीट रस्त्यांमध्ये खोदाई करणे– ४८५४ रुपये प्रति मिटर
- पेव्हर ब्लॉक, फुटपाथमध्ये खोदाई– ४८७० रुपये प्रति मिटर

यापुढे रस्ते दुरूस्तीचा संपूर्ण खर्च संबंधित मोबाइल कंपन्यांकडून वसूल केला जाईल. त्याअनुषंगाने नवीन दरसुची तयार करण्यात आली आहे. या नवीन दरसुचीप्रमाणे शुल्क वसूल केले जाणार आहे. ठराव प्राप्त होताच त्याची अंमलबजावणी केली जाईल.

– संजय अग्रवाल, शहर अभियंता, महापालिका

## विमानाच्या कॉकपिटमध्ये घुसण्याचा प्रयत्न
## ९ प्रवासी ताब्यात

**मुंबई :** रविवारी बंगळुरूहून वाराणसीला जाणाऱ्या एअर इंडिया एक्स्प्रेसच्या विमानात एका प्रवाशाने अचानक कॉकपिटचे दार उघडण्याचा प्रयत्न केला. विमान अपहरणाचा प्रयत्न असल्याचे वाटल्याने प्रवाशांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण पसरले होते. लँडिंगनंतर या प्रवाशासह एकूण नऊ जणांना सीआयएसएफच्या ताब्यात देण्यात आले.

एअर इंडियाने या घटनेबाबत माहिती देताना सांगितले की, बंगळुरू-वाराणसी फ्लाईटमधील एक प्रवासी शौचालयात जाण्याच्या निमित्ताने कॉकपिटजवळ केला. मात्र सुदैवाने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. आम्ही सर्वांना खात्री देऊ इच्छितो की, विमानात कडक सुरक्षा उपाययोजना करण्यात आल्या आहेत. लँडिंगनंतर तत्काळ अधिकाऱ्यांना या घटनेची माहिती देण्यात आली असून, सध्या चौकशी सुरू आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रवाशाने कॉकपिटच्या दारावरील पासकोड टाकत ते उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र पासकोड टाकल्याचे वैमानिकाला समजल्यानंतर त्याने अपहरणाच्या शक्यतेने दार लॉक करून घेतले.

# अंबड लिंकरोड परिसरात पाण्यासाठी वणवण

## महिलांनी मनपाविरोधात व्यक्त केला तीव्र निषेध



**नाशिक :** मनपा अधिकाऱ्यांचे ढिसाळ नियोजन व निष्काळीपणामुळे सिडको भागात अनेक ठिकाणी नागरिकांना पिण्यापुरतेही पाणी मिळत नसल्याचे प्रकार सातत्याने घडत आहेत. त्यामुळे संतप्त झालेल्या महिलांनी सोमवारी (दि. २२) एकत्र येत मनपाविरोधात घोषणाबाजी करीत तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

सिडको परिसरात पिण्यासाठीही पुरेसे पाणी मिळत नसल्याने खासगी टँकरच्या माध्यमातून नागरिक पाणी विकत घेत आहे. धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असताना देखील सिडकोत नागरिकांना पिण्यापुरतेही पाणी उपलब्ध होत नसल्याचे प्रकार घडत असल्याने संतप्त महिलांनी सोमवारी (दि. २२) सायंकाळी अंबड लिंकरोड परिसरातील पाथर्डीफाटा जलकुंभ तसेच सोसायटी परिसरात मनपा प्रशासना विरोधात संताप व्यक्त केला होता. पार्श्वनाथ संकुल, जनता स्वीटजवळ, अंबड लिंकरोड या भागातील रहिवाशांना गेल्या अनेक दिवसांपासून अत्यंत कमी दाबाने व अत्यल्प पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे येथील महिलांनी पाथर्डी फाटा येथीलजल कुंभावर जाऊन अधिकाऱ्यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. मात्र अधिकारी उपलब्ध नसल्याने महिला वर्गाने तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच सोसायटी परिसरात रिकामा हंडा घेत मनपाविरोधात निषेध आंदोलन केले.

यावेळी सुजाता सांगळे, मेघा पुरोहित, रुपली महाले, रत्ना आंधळे, श्वेता अहिर, डॉ. पुष्पा चौधरी, सोनाली मुर्तडक, राधा भिंगारदिवे, जयश्री शिरसाट, उज्वला आहीरे, ज्योती गहाणकरी यासह सोसायटी परिसरातील महिला यावेळी उपस्थित होत्या.

# नाशिकरोडला ८७ मंडळांनी केली घटस्थापना

**नाशिकरोड :** नाशिकरोड भागात नवरात्रोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली असून नासिकरोड व उपनगर पोलिस ठाण्यांच्या हद्दीत एकूण ८७ सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांनी घटस्थापना करून देवीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे.



यात उपनगर पोलिस स्टेशनच्या हद्दीत ४४ तर, नाशिकरोड पोलिस स्टेशनच्या हद्दीत ४३ सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांची देवीच्या मूर्तीची स्थापना केली आहे. त्याचप्रमाणे घरोघरी घटस्थापना करण्यात आली आहे.

नाशिकरोड, देवळीगावचे ग्रामदैवत आसलेले श्री दुर्गा देवी मंदिरात महापालिका नाशिकरोड विभागीय अधिकारी प्रज्ञा त्रिभुवन यांचे हस्ते घटस्थापना व पूजा करण्यात आली. श्री दुर्गा देवी मंदिर टस्ट चे अध्यक्ष उत्तमराव फडोळ, कार्याध्यक्ष सूर्यकांत लवटे, सचिव विद्युत पडवळ, खजिनदार रणजित सिंग आनंद, उपाध्यक्ष रामदास सदाफुले, सदस्य लक्ष्मण थोरमिसे, भुपेंद्र लाल, बबन गवळी, सुरेश जैन, उमेश शेलार, कैलास आहिरे, राजेंद्र गोसावी, दिलीप जगताप, तुषार फडोळ, लक्ष्मण बोडके हे संयोजन करीत आहेत.

त्याचप्रमाणे देवळालीगाव श्री रेणुकामाता मंदिर, सुभाष रोडवरील श्री सप्तशृंगी माता मंदिर, देवी चौकातील श्री संतोषी माता मंदिर, जगताप मळ्यातील श्री सप्तशृंगी माता मंदिर, श्री भगवती माता मंदिर, जेलरोड श्री दुर्गा देवी माता मंदिरात नवरात्रीनिमित्त घटस्थापना व महापूजा झाली.

जय भवानीरोड येथील श्री तुळजाभवानी मंदिरात विश्वस्त मंडळाचे खजिनदार राजेंद्र गायकवाड आणि सुरेखा गायकवाड यांच्या हस्ते तसेच विश्वस्त शिवाजी कदम, शोभा कदम व किरण सहाणे, दीपा सहाणे यांच्या हस्ते घटस्थापना करून शारदीय नवरात्रोत्सव २०२५ ची सुरुवात झाली. याप्रसंगी श्री तुळजाभवानी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ॲड. शिवाजी सहाणे वैशाली सहाणे, सचिव सुभाष पाटोळे, रोहिणी पाटोळे, कार्याध्यक्ष किशोर जाचक,कीर्ती जाचक, उपाध्यक्ष रमेश थोरात, अरुणा थोरात सहसचिव कैलास कदम व वंदना कदम, सहखजिनदार रवींद्र गायकवाड व सुनीता गायकवाड, तसेच विश्वस्त श्री रुंजा पाटोळे, लता पाटोळे, पोपट पाटोळे, संगीता पाटोळे , शिवाजी लवटे, बाळासाहेब चव्हाण, शारदा चव्हाण उपस्थित होते.

# मान्सूनची काही भागांतून माघार

**पुणे :** राज्यात ठिकठिकाणी ढगाळ हवामानासह हलका ते जोरदार पाऊस पडत आहे. राज्यात अनेक भागांत पुढील पाच दिवस मेघगर्जनेसह पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, मान्सूनने देशाच्या आणखी काही भागांत माघार घेतली.

पावसाला अनुकूल असलेले हवेचे कमी दाबाचे क्षेत्र तयार होत आहे. त्यामुळे राज्यात पाऊस सक्रिय होत आहे. सोमवारी कोकणात पावसाचा जोर अधिक होता. मुंबई येथे २१ मिमी, सांताक्रुझ १३, अलिबाग १४ तर डहाणू येथे ७५ मिमी इतका जोरदार पाऊस झाला. मध्य महाराष्ट्रातील पुणे येथे ५.७, अहिल्यानगर ४.४, महाबळेश्वर २०, सातारा ६ तर सोलापूर येथे ०.१ मिमी पाऊस पडला. मराठवाड्यातील धाराशीव येथे ३४ मिमी, छत्रपती संभाजीनगर ४ तर विदर्भातील अमरावती २४, बुलढाणा १ तर चंद्रपूर येथे ३ मिमी पावसाची नोंद झाली.

मान्सून यंदा आपल्या सरासरी वेळेच्या तीन दिवस आधीच म्हणजेच १४ सप्टेंबरला परतीच्या प्रवासावर निघाला होता. त्यानंतर मान्सूनने सोमवारी पंजाब, हरयाणा, राजस्थान आणि गुजरातच्या काही भागांतून माघार घेतली. पुढील २ ते ३ दिवसांत मान्सून गुजरात, राजस्थान, हरयाणा आणि पंजाब, उत्तर प्रदेश, दिल्ली, हिमाचल प्रदेश तसेच जम्मू आणि काश्मीरच्या काही भागांतून परतणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

पान १ वरून

# पावसाचे पुन्हा थैमान

झोपलेल्या वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची घटना भूम तालुक्यातील उळूप शिवारात घडली. परभणी व धाराशिव जिल्ह्यात दोन तरुण वाहून गेले. छत्रपती संभाजीनगरमध्येही जोरदार पाऊस झाला. एनडीआरएफ, आपत्ती व्यवस्थापन पथकाकडून हेलिकॉप्टरद्वारे बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.

**धाराशिवला ६५ मिमी पाऊस**

जिल्ह्यात २४ तासांत सरासरी ६५ मिमी पाऊस झाला. २१ मंडळांत अतिवृष्टी झाली. नद्या, ओढ्यांना पूर आल्याने हेलिकॉप्टर, होडीद्वारे १५० नागरिकांना सुखरूप बाहेर काढले. शेतातील माती वाहून गेली. खरीप पिकांचेही अतोनात नुकसान झाले.भूम, परंडा तालुक्यात पुराच्या पाण्यात शेकडो जनावरे, संसारोपयोगी साहित्य, अन्नधान्य, कृषी अवजारे वाहून गेली. अनेक घरांची पडझड झाली.

**शेकडो नागरिकांनी रात्र जागून काढली**

भूम तालुक्यातील उळूप शिवारातील शेतातील शेडमध्ये देवनाबाई नवनाथ वारे (८५, रा. चिंचोली) या झोपल्या होत्या. रात्री शेडमध्ये पाणी आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला. परंडा शहरातील सखल भागासह अनेक गावांतील शेतवस्तीच्या ठिकाणी पाणी आल्याने नागरिकांनी रविवारी रात्री छतावर चढून रात्र जागून काढली. सोमवारी सकाळी एनडीआरएफ, आपत्ती व्यवस्थापनच्या पथकाने बचावकार्य सुरू केले. परंडा तालुक्यात हेलिकॉप्टर व बोटीद्वारे पुरात अडकलेल्या ६३ नागरिकांची सुटका करण्यात आली.

**लातूर जिल्ह्यात सर्व प्रकल्प ओव्हरफ्लो**

मागील पाच ते सहा दिवसांपासून जिल्ह्यातील विविध मंडळांत ढगफुटीसदृश पाऊस होत आहे. मध्यम प्रकल्प तुडुंब भरल्याने नदीपात्रात विसर्ग केला जात आहे. मांजरा, तेरणा, तिरू या नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. औसा तालुक्यातील उजनी, किल्लारी, निलंगा तालुक्यातील मदनसुरी, औराद शहाजानी या भागांत तेरणेने एक ते दोन किलोमीटरपर्यंतचे क्षेत्र कवेत घेऊन प्रवाहित झाली आहे. त्यामुळे सोयाबीन, तूर, उडीद व ऊस आदी शेकडो हेक्टर्सवरील पिके पाण्याखाली गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. पाऊस व नदीच्या पाण्यामुळे ओढे व नाल्यांना पूर येऊन १५ ते २० गावांचा संपर्क तुटला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे.रविवारी मध्यरात्रीपासून ते सोमवारी पहाटेपर्यंत किल्लारी, उजनी, बेलकुंड हलगरा, देवणी, भादा, रेणापूर, गाधवड, औराद शहाजानी, नदीहत्तरगा, जेवरी, सांगवी, धनेगाव आदींसह परिसरात पर्जन्यवृष्टी झाली. तसेच सोमवारी दिवसभर लातूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस चालूच होता.

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे परिस्थितीवर लक्ष ठेवून**

**ठाणे :** मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांशी फोनवरून संवाद साधून परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी पुराच्या पाण्यात अडकून पडलेल्या नागरिकांना तातडीने मदत करून त्यांना सुरक्षितस्थळी हलवण्याचे निर्देश त्यांनी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिले.

# जीएसटी सुधारणांमुळे बचत वाढेल!

सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योजक अशा सर्वच समाज घटकांना फायदा होईल. या सुधारणा गुंतवणुकीला प्रोत्साहन देतील आणि राज्य व देशाच्या प्रगतीला गतिमान करतील, असे मोदींनी पत्रात म्हटले. नव्या जीएसटीत आता ५ टक्के आणि १८ टक्के असे दोनच स्लॅब आहेत. अन्न, औषधे, साबण, टूथपेस्ट, विमा यांसह अनेक दैनंदिन जीवनावश्यक वस्तू आता करमुक्त असतील किंवा ५ टक्क्यांच्या सर्वात कमी स्लॅबमध्ये आल्या आहेत. आधीच्या १२ टक्क्यांच्या स्लॅबमधील जवळपास ९९ टक्के वस्तू ५ टक्क्यांच्या स्लॅबमध्ये आल्या आहेत, असे त्यांनी सांगितले. गेल्या काही वर्षांत, २५ कोटी लोक दारिद्र्यरेषेतून बाहेर आले आहेत. देशात एक आकांक्षावादी नव-मध्यमवर्ग तयार झाला आहे. आम्ही मोठ्या प्रमाणात प्राप्तीकरात कपात करून आमच्या मध्यमवर्गाचे हात बळकट केले आहेत. १२ लाख रुपयांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न करमुक्त करण्यात आले आहे. ही कर कपात आणि जीएसटी सुधारणा एकत्रित केल्या तर देशवासीयांची अडीच लाख कोटी रुपयांची बचत होते, असे पंतप्रधान म्हणाले.

२०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न साकार करणे हे आपले सामुदायिक ध्येय असल्याचे सांगत मोदींनी या ध्येयप्राप्तीसाठी स्वावलंबित्व, स्वदेशीवर भर दिला. या सणासुदीच्या काळात, आपण मेड इन इंडिया उत्पादनांना पाठिंबा देण्याचा संकल्प करूया. भारतीयांचा घाम, कष्ट असलेल्या स्वदेशी उत्पादनांचीच खरेदी करूयात. जेव्हा आपण स्वदेशीला प्राधान्य देतो तेव्हा अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाला मदत करतो आणि युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करतो. आपण अभिमानाने म्हणूया की, मी जे खरेदी करतो ते स्वदेशी आहे आणि मी जे विकतो ते स्वदेशी आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

# ‘संघ’ घेणार एक लाख हिंदू संमेलने

रेशीमबागच्या डॉ. हेडगेवार स्मृतिमंदिर परिसरात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी रा. स्व. संघाच्या विजयादशमी उत्सवासंदर्भात माहिती दिली. संघाच्या शताब्दी वर्षात वर्षभर घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची सुरुवात २ ऑक्टोबरला नागपूरच्या रेशीमबाग मैदानावर आयोजित विजयादशमीच्या मुख्य उत्सवाने होणार आहे. तसेच देशभरात संघाच्या प्रत्येक शाखेत विजयादशमी उत्सव आयोजित केला जाणार आहे. वर्षभर आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये पंचपरिवर्तन अभियानावर आधारित ‘गृहसंपर्क’ व हिंदू संमेलन घेण्यावर भर राहणार आहे. समाजातील विविध स्तरांतील नागरिक या हिंदू संमेलनाचे आयोजन करतील. युवावर्ग हिंदू संमेलनाच्या तयारीला लागला आहे. संघाच्या शताब्दीवर्षात आयोजित होणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये हिंदू संमेलन हा महत्त्वाचा विषय राहणार आहे. याकरता स्थानिकस्तरावर समित्या गठित केल्या जात आहेत. ग्रामीण भागात सात-आठ गावे व शहरी भागात विविध वस्त्यांद्वारे हिंदू संमेलने घेतली जातील.


**Godrej Housing Finance Limited** — Godrej | HOUSING FINANCE — A Godrej Capital Company

**सार्वजनिक सूचना**

**‘गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड’ द्वारे १७ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या मास्टर डायरेक्टेशन - नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी - हाऊसिंग फायनान्स कंपनी (रिझर्व्ह बँक) डायरेक्टेशन्स, २०२१ च्या परिच्छेद ९३ नुसार जाहीर सूचना, जी वेळोवेळी अद्यतनित केली जाते.**

**गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** ("कंपनी" किंवा "GHFL") ही कंपनी कायदा, २०१३ अंतर्गत समाविष्ट केलेली एक सार्वजनिक मर्यादित (कॉर्पोरेट ओळख क्रमांक: U65100MH2018PLC315359) कंपनी आहे आणि भारतीय रिझर्व्ह बँकेत (COR. क्रमांक: DOR - 00184) एक नॉन-डिपॉझिट स्वीकारणारी नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी - हाऊसिंग फायनान्स कंपनी ("NBFC - HFC") म्हणून नोंदणीकृत आहे. GHFL चे नोंदणीकृत कार्यालय गोदरेज वन, पिरोजशानगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००७९, महाराष्ट्र येथे आहे.

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी या सूचनेच्या तारखेपासून ३ महिन्यांपर्यंत कामकाजाच्या कारणास्तव, उत्तम टॉवर, सेंट अँड्रयूज चर्चच्या बाजूला, शरणपूर, लिंक रोड, नाशिक - ४२३००२, महाराष्ट्र येथील तिचे शाखा कार्यालय बंद करणार आहे.

सदर शाखेचे सर्व कामकाज आणि ग्राहक सेवा कार्यालय क्रमांक ५०६, ५ वा मजला, पद्मविश्व लँडमार्क, ॲक्सिस बँकेच्या वर, सर्व्हे क्रमांक ६४७/१४ / प्लॉट क्रमांक ३, राक्का कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक - ४२२००२, महाराष्ट्र येथील शाखा कार्यालयातून होणार आहे.

ग्राहकांच्या सर्व शंका customercare@godrejcapital.com वर सोडवता येतील.

या संदर्भात कोणतेही स्पष्टीकरण किंवा चौकशी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात श्री. योगेश जैन, मुख्य अनुपालन अधिकारी यांना पाठवलेल्या या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या कालावधीत किंवा compliance@godrejhf.com वर संपर्क साधू शकतात.

Sd/-
गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या वतीने

स्थळ: मुंबई
दिनांक: 23.09.2025



**पुणे नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., पुणे (महाराष्ट्र)**
४९/१, ऋतुरंग संकुल, सी–डी बिल्डिंग, अरण्येश्वर कॉर्नर, पर्वती, पुणे ४११००९.

**भगिनी निवेदिता सहकारी बँक मर्यादित पुणे** या प्रथितयश बँकेस अहिल्यानगर व पुणे येथील शाखांकरीता **लेखनिक** पदाच्या ३० जागांकरीता **केवळ महिला उमेदवारांची** भरती करावयाची आहे. यासाठी पुणे नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., पुणे (महाराष्ट्र) द्वारे घेण्यात येणाऱ्या **ऑनलाईन** परीक्षेद्वारे आणि त्यात कट–ऑफ पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या उमेदवारांची मुलाखतीद्वारे निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांची सुरुवातीला एक वर्षाच्या ट्रेनी व प्रोबेशन कालावधीकरीता नियुक्ती केली जाईल. सदर नियुक्ती बँकेच्या कार्यक्षेत्रात कुठेही करण्यात येईल कृपया याची नोंद घ्यावी.

खालीलप्रमाणे पात्रता असलेल्या महिला उमेदवारांनी सदर जाहिरात प्रसिध्द झालेपासून १५ दिवसात **www.punebankasso.com** या वेबसाईटवर **भगिनी निवेदिता सहकारी बँक लि., पुणे** साठी दिलेल्या जाहिरातीचे खाली दिलेल्या Click to apply येथे आपले अर्ज भरावेत.

**१. पदसंख्या:– ३०**
**२. आवश्यक पात्रता:–**
**अ) कोणत्याही शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आवश्यक**
**ब) MS-CIT**/समतुल्य प्रमाणपत्र **(equivalent certification course)** अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
**क) वयोमर्यादा :** किमान २२ वर्षे ते कमाल ३५ वर्षे. (दि. ३१.०८.२०२५ अखेर)
**३. प्राधान्य– JAIIB/CAIIB/GDCA/** शासन मान्यता प्राप्त इतर संस्थेची बँकिंग/सहकार/ कायदेविषयक पदविका असल्यास तसेच बँक/पतसंस्था/इतर वित्तीय संस्थेतील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
४. परीक्षा शुल्क– रु.८८५/–(जीएसटी सह) (नापरतावा)
**५. परीक्षा पध्दती – ऑनलाईन**
**६. परीक्षेचे ठिकाण – पुणे**

पात्रता निकषात न बसणाऱ्या उमेदवारांनी परीक्षेचा अर्ज भरल्यास अथवा भरलेली माहिती चुकीची आढळल्यास संबंधित अर्ज बाद करण्यात येईल तसेच त्यासाठी भरण्यात आलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत दिले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.
परीक्षेचे ठिकाण व दिनांक, परीक्षेचे स्वरुप इत्यादीबाबतची माहिती पात्र उमेदवारांना त्यांचे ई–मेलद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.



**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**
**विद्युत विभाग**
**जाहीर (फेर) ई–निविदा सूचना क्र. ०१/२०२५–२६**

मा. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांचेमार्फत विद्युत विभागाकडील मनपा निधी अंतर्गत मालेगाव शहरात पथदीप व्यवस्थेकरीता एल.ई.डी. पथदीप पुरविणे व बसविणे या कामासाठी जाहीर फेर ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा सूचना ही महाराष्ट्र शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर (फेर) ई-निविदा सूचनेत कामासंबंधीची संपूर्ण माहिती विद्युत विभागात उपलब्ध असून सदर कामासंबंधी सर्व अटी / शर्ती निविदा फॉर्म सोबत आहेत. तसेच सदर कामासाठी आवश्यक माहिती विद्युत अधीक्षक मालेगाव महानगरपालिका यांचे कार्यालयाकडून प्राप्त करता येईल.

दिनांक :- २३/०९/२०२५ ते ३०/०९/२०२५

सही /-
**आयुक्त तथा प्रशासक**
**मालेगाव महानगरपालिका, मालेगाव**

जा.क्र./मामनपा/विद्युत विभाग/३५८/२०२५
दिनांक: २२/०९/२०२५



**री- डेव्हलपमेंटसाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहे**

**शंकरनगर को–ऑप हौसिंग सोसायटी लि; नाशिक**
**टाकळी रोड, व्दारका, नाशिक- ४२२०११.**

**इतर माहिती:** गृहनिर्माण संस्थेचा नोंदणी क्रमांक : एनएसके/एचएसजी/टी. सी/४२७/८६
नोंदणी दिनांक : २९/०४/१९८६
एकुण सभासद : १०३ (६३ सदनिका व ४० गाळे)
पुनर्विकासाचे एकुण क्षेत्र : ३२०१. २७ चौ. मी. (०८ प्लॉट)

**चतु:सिमा मंजुर लेआऊटप्रमाणे :**
**पुर्वेस :** काठे गल्ली लिंक रोड (१५ मीटर), **पश्चिमेस :** कॉलनी रोड (०६ मीटर)
**दक्षिणेस :** कॉलनी रोड (०९ मीटर), **उत्तरेस :** टाकळी रोड (१८ मीटर)

**प्रस्तावा सोबत सादर करावयाची कागदपत्र :**
१. कंपनीची सविस्तर प्रोफाईल
२. आर्थिक क्षमता व त्याबाबतचे पुरावे
३. पुर्ण केलेले प्रकल्पांची माहिती व पुरावे
४. सविस्तर प्रस्ताव (वाढीव बांधकाम, सुख-सुविधा, भाडे व कालावधी)
५. इमारतीची डिझाईन

पात्र व अनुभवी बिल्डर्स/डेव्हलपर्स/प्रमोटर्स यांच्याकडुन प्रस्ताव मागविण्यात येत आहे
**प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत : जाहिरात प्रकाशित झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत**

**अधिक माहितीसाठी संपर्क :**

| चेअरमन | सेक्रेटरी | अध्यक्ष, पुनर्विकास समिती |
|---|---|---|
| 9577441010 | 9226887612 | 9823899883 |

कार्यालयाचा पत्ता : शॉप क्र. २१ ड शंकरनगर को-ऑप हौसिंग सोसायटी, टाकळी रोड,व्दारका, नाशिक-४२२०११.

**टिप: अंतिम निर्णय घेण्याचा हक्क व अधिकार संस्थेचाच असेल**



**नाशिक जिल्हा मजूर संस्थांचा सहकारी संघ मर्या., नाशिक**
नोंदणी क्रमांक : एनएसके/पीआरडी/एल–१२०, दि. ०७/०२/१९६९
‘श्रमसहकार’ तिडके कॉलनी, चुंबळे मार्ग, त्र्यंबकरोड, नाशिक–२ दुरध्वनी क्र. ०२५३–२५७५१९५

**५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**
**(फक्त सभासद मजूर संस्थांसाठी)**

नाशिक जिल्हा मजूर संस्थांचा सहकारी संघ मर्या., नाशिक ह्या संघाची **५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक : ३०/०९/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. संघाच्या तिडके कॉलनी, चुंबळे मार्ग, त्र्यंबकरोड, नाशिक येथील ‘श्रमसहकार’ ह्या इमारती समोरील स्त्री मंडळाच्या हॉलमध्ये आयोजित करण्यात आली आहे.**

सभेची सूचना व विषयपत्रिका पोष्टाने पाठविण्यात आलेली आहे. संघाच्या सर्व सभासद मजूर संस्थांना विनम्र आवाहन करण्यात येते की, त्यांनी सदर सभेस आपला एक प्रतिनिधी पंचकमेटीच्या ठरावाने नियुक्त करुन पाठवावा. सदर सभेस आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**श्री. शशिकांत बन्सीलाल उबाळे** — उपाध्यक्ष
**श्री. राजेंद्र शंकरराव गावित** — अध्यक्ष



**MAHATRANSCO** — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**MSETCL/HR/EHV CCCM Circle/Tender- 01/2025-26 (2nd call)**
**For Engaging Skilled & Unskilled Manpower on Outsourcing Basis for MSETCL**

1. Maharashtra State Electricity Transmission Company Limited (MSETCL) a wholly owned corporate entity under the Government of Maharashtra, incorporated under the Companies Act, 1956 intends to engage Skilled & Unskilled Manpower at MSETCL Civil Circle Office, Nashik for job work for a period of **One Year OR till the requirement exists** purely on Outsourcing Basis through Manpower Provider Firms / Agencies.
2. The Estimated Tender cost is **Rs. 19,16,438.00/- (In Figures) (Rs. Nineteen Lakh Sixteen Thousand Four Hundred Thirty Eight Only) (Approximately) including GST.** Online Bids are invited from registered Manpower Firms / Agencies for providing Skilled & Unskilled Manpower on the terms and conditions mentioned in Tender Document No. MSETCL/HR/EHV CCCM Circle/Tender-01/2025-26 (2nd call) made available on website **https://srmetender.mahatransco.in** with **RFx No. 7000037696.** The Sale period will start from **23/09/2025 @ 10:00 Hrs to 02/10/2025 @ 18:00 Hrs.**
3. Selection of Bidder will be strictly on the basis of fulfillment of the eligibility criteria and considering past performance.

**Sd/-**
**Superintending Engineer (Civil)**
**MSETCL, EHV CCCM Circle, Nashik**



ऑफर — घरा घरात... मना मनात... पुण्य नगरी — ऑफर

**APPOINTMENT**

ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.

**आता सवलतीच्या दरात**

| | |
|---|---|
| उत्तर महाराष्ट्र | रु. ४९९९/– |
| मुंबईसह कोकण विभाग | रु. ४९९९/– |
| मराठवाडा विभाग | रु. ४९९९/– |
| पश्चिम महाराष्ट्र | रु. ४९९९/– |
| विदर्भ | रु. ४९९९/– |
| कोणतेही दोन विभाग | रु. ७४९९/– |
| कोणतेही तीन विभाग | रु. ११४९९/– |
| कोणतेही चार विभाग | रु. १५४९९/– |
| संपुर्ण महाराष्ट्र | रु. १९४९९/– |

वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल. | हे दर एप्रिल २०२५ पासून लागू. | स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार

जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा **18002081019**
E-mail:customercare@sapp.in